## डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/९८९ /२०२५ दि. १७/०७/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीम्ध्ये मोठागाव–मानकोली असा उड्डाणपुल वाहतुकीसाठी सुरू झाला आहे. हा रस्ता सुरू झाल्यानंतर भिंवडी–ठाणे ते डोबिंवली असा मार्ग जवळचा असल्याने त्या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची रहदारी आहे. तसेच डोबिंवली शहरात अरूंद रस्त्याचे अनुषंगाने वाहतुक कोंडी होवु नये यामुळे मानकोलीकडुन मोठागाव कडे उड्डाणपुल मार्गे जाण्यास जड, अवजड वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात आला आहे. तसेच मोठागाव रेल्वेफाटक क्रासिंग दरम्यान, रेती बंदर रोड, डोंबिवली प. येथे जड, अवजड वाहनांची रहदारी सुरू राहिल्यास नमुद मार्गावर अनावश्यक रित्या मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी दीर्घकाळ होण्याची शक्यता आहे. संभाव्य वाहतुक कोंडी टाळण्यासाठी मोठागाव रेल्वे फाटक क्रॉसिंग दरम्यान या रस्त्यावर सर्व प्रकारचे अवजड वाहनांना वाहतुकीस मनाई करणे व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातुन आवश्यक असुन असे न केल्यास अपघात होऊन जिवीत व वित्तहानी होण्याची स्थिती निर्माण होईल व प्रसंगी आपत्कालीन परिस्थितीत वाहतुक कोंडी सोडविणे व अपघातग्रस्तांना मदत पुरविणे अशा आपत्कालीन परिस्थितीत मोठ्या समस्या व अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठागाव रेल्वे क्रॉसिंग दरम्यानच्या रेतीबंदर या रस्त्यावर संभाव्य वाहतुक कोंडी टाळणे, वाहतुक सुरळीत व सुरक्षित रहावी यास्तव तसेच आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** स्वामीनारायण सिटी चौक येथुन मोठागाव रेल्वेफाटक क्रॉसिंग, रेती बंदर रोड, डोंबिवली प. कडे येणाऱ्या जड, अवजड वाहनांना **पाण्याची टाकी, नवीन कोपर गाव क्रॉस रोड येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग –** सदरची जड–अवजड वाहने उजवे वळण घेवुन नवीन कोपर गाव क्रॉस रिंगरोडने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** पं. दिनदयाळ उपाध्ये मार्ग व रेतीबंदर रोड कडुन मोठागाव रेल्वेफाटक क्रॉसिंग कडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांना **रेतीबंदर चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग –** सदरची जड–अवजड वाहने पं. दिनदयाळ उपाध्ये मार्गाने पुढे म. गांधी रोड–कोपर रोड– नवीन कोपर गाव क्रॉस रिंगरोडने रेल्वे फाटकाच्या पलिकडे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण

CamScanner

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner

मोठागाव रेल्वेफाटक अवजड वाहनांना प्रवेशबंदी

— : गुगल मॅप :-

